# 'ज्ञानोबा माझा' या नाटकाचे येत्या शनिवारी आणि रविवारी प्रयोग

सकाळ वृत्तसेवा

पुणे, ता. २९ : संत ज्ञानेश्वर महाराजांच्या जीवनावर आधारित 'ज्ञानोबा माझा' हे नाटक नवीन वर्षात रसिकांच्या भेटीस येत आहे. श्रीपाद सेवा मंडळाने नाटकाची निर्मिती केली असून, ऋग्वेद या संस्थेने ते रंगमंचावर आणले आहे.

येत्या शनिवारी आणि रविवारी बालगंधर्व, टिळक स्मारक आणि यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे या नाटकाचे प्रयोग होणार आहेत.

वारकरी संप्रदायाचे मामासाहेब देशपांडे यांनी लिहिलेल्या 'चैतन्य चक्रवर्ती' या मूळ चार अंकी संगीत नाटकाच्या गाभ्याला धक्का न लावता ज्येष्ठ रंगकर्मी अशोक समेळ यांनी या संहितेचे कालसुसंगत पुनर्लेखन केले आहे.

डॉ. विद्याधर ओक यांच्या संगीतामुळे आणि राहुल देशपांडे आणि अमोल बावडेकर यांच्या पार्श्वगायनामुळे नाटकाला विशेष रंगत आली आहे. ज्येष्ठ नेपथ्यकार राजन भिसे यांचे नेपथ्य असून, वेदश्री आगाशे, आश्विन धाक्रस, अंकुर देशमुख, रसिका जोग आदी कलाकारांच्या यात प्रमुख भूमिका आहेत.

श्रीपाद सेवा मंडळ ही सेवाभावी संस्था असून, श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या जीवनकार्याचा आणि तत्त्वज्ञानाचा प्रसार हे तिचे मुख्य उद्दिष्ट आहे, अशी माहिती संस्थेचे जनसंपर्क अधिकारी राजीव पांडे यांनी दिली.



ज्ञानोबा माझा या नाटकातील एक दृश्य.